# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date: 17 May 2024

Time: 7.10 AM to 7.20 AM

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक: १७ मे २०२४ सकाळी ७.१० मि.**

****

***ठळक बातम्या***

- **लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात ६७ टक्के मतदान–४५ कोटींहून अधिक नागरिकांनी बजावला मतदानाचा हक्क**
- **पाचव्या टप्प्याचा प्रचार उद्या थांबणार–मुंबईत महायुतीची आज शिवाजी पार्कवर तर महाविकास आघाडीची बीकेसीवर प्रचार सभा**
- **बीड इथल्या सुमीत वाघमारे हत्या प्रकरणात दोन आरोपींना जन्मठेप**

**आणि**

- **भारतीय फुटबॉलपटू सुनील छेत्री निवृत्त–सहा जून रोजी कोलकात्यात अखेरचा सामना**

***सविस्तर बातम्या***

देशात सुरु असलेल्या लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या चार टप्प्यात जवळपास ६७ टक्के मतदान झालं असून, ४५ कोटींहून अधिक नागरिकांनी मतदानाचा हक्क बजावला आहे. निवडणूक आयोगाच्या वतीनं काल ही माहिती देण्यात आली. मतदानाची उच्च टक्केवारी हा भारतीय मतदारांनी जगाला दिलेला संदेश आहे, असं सांगत, उर्वरित टप्प्यात मतदारांना मोठ्या संख्येनं मतदान करण्याचं आवाहन निवडणूक आयोगानं केलं आहे.

दरम्यान, लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यासाठी येत्या २० मे रोजी मतदान होणार आहे. या टप्प्यात राज्यातल्या धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण, ठाणे आणि मुंबईतल्या सहा मतदारसंघांचा समावेश आहे. या सर्व मतदारसंघात प्रचार उद्या संपत असून, सर्वच राजकीय पक्षांचे नेते सभा, बैठका, पदयात्रा काढून जोरदार प्रचार करत आहेत.
भाजप नेते पंतप्रधान नरेंद्र मोदी आज संध्याकाळी मुंबईत शिवाजी पार्कवर प्रचार सभा घेणार आहेत. तर वांद्रे कुर्ला संकुलात इंडिया आघाडीची सभा होणार आहे.

महायुतीचे नाशिक लोकसभा मतदारसंघाचे उमेदवार हेमंत गोडसे यांच्या प्रचारासाठी काल नाशिक शहरात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल रोड शो काढला. कल्याण लोकसभेचे महायुतीचे उमेदवार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रचारासाठी मुख्यमंत्र्यांनी डोंबिवलीतही रॅली काढली.
उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल मुंबईत कुर्ला इथं महायुतीचे उमेदवार उज्ज्वल निकम यांच्या प्रचारार्थ सभा घेतली. त्यानंतर फडणवीस आणि भाजप नेत्या पंकजा मुंडे यांनी दिंडोरी मतदारसंघातल्या महायुतीच्या उमेदवार डॉ. भारती पवार यांच्या प्रचारासाठी मनमाड इथं सभा घेतली.

राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांनी काल धुळे लोकसभा मतदारसंघाच्या महाविकास आघाडीच्या उमेदवार डॉ.शोभा बच्छाव यांच्या प्रचारार्थ सटाणा इथं सभा घेतली. त्यानंतर त्यांनी दिंडोरी लोकसभा मतदार संघातले महाविकास आघाडीचे उमेदवार भास्कर भगरे यांच्या प्रचारासाठी मनमाड इथं सभा घेतली.
शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी काल ठाणे मतदारसंघातले महाविकास आघाडीचे उमेदवार राजन विचारे यांच्या प्रचाराची ठाणे शहरात सभा घेतली.
दरम्यान, ठाणे मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार नरेश म्हस्के यांनी 'नमो नम: वचननामा', तर कल्याण लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार श्रीकांत शिंदे यांनी देखील आपला वचननामा काल प्रसिद्ध केला.

****

'लोकनिर्णय महाराष्ट्राचा ' या कार्यक्रमात आजच्या भागात आपण दक्षिण मुंबई लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात या वेळेत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

****

मुंबईत घाटकोपरमधे फलक कोसळून झालेल्या दुर्घटनेसंदर्भात मुख्य आरोपी भावेश भिंडे याला मुंबई पोलिसांच्या गुन्हे शाखेनं काल उदयपूरमधून अटक केली. भावेश भिंडे याच्याविरोधात सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात आला आहे. १३ तारखेला झालेल्या या दुर्घटनेत १६ जणांचा मृत्यू झाला होता. दरम्यान, या दुर्घटनेतलं बचावकार्य काल पूर्ण झालं. मुंबई महापानगरलिकेचे आयुक्त भुषण गगराणी यांनी पत्रकार परिषदेत ही माहिती दिली.

****

बीड इथल्या सुमीत वाघमारे हत्या प्रकरणात जिल्हा आणि सत्र न्यायालयानं आरोपी बालाजी लांडगे आणि संकेत वाघ यांना जन्मठेपेची शिक्षा सुनावली आहे. आरोपी बालाजी याच्या बहिणीने सुमीत याच्याशी प्रेमविवाह केल्यामुळे त्याने मित्राच्या मदतीने १९ डिसेंबर २०१८ रोजी बीड इथं सुमीतची हत्या केली होती, या प्रकरणातल्या अन्य आरोपींची न्यायालयानं पुराव्याअभावी सुटका केली आहे

****

जालना जिल्ह्यातल्या परतूर नगरपरिषदेचा मुख्याधिकारी अभिषेक परदेशी याच्या स्टेट बँक ऑफ इडियाच्या लॉकरची लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं न्यायालयाच्या आदेशानं काल झडती घेतली. या लॉकरमध्ये २५ लाख रुपये आणि साडेचार तोळे सोने आढळून आलं. परदेशी याला नगरपरिषदेमधला कर्मचारी अनिल पारीख याच्यासह लाचलुचपत प्रतिबंधक विभागानं काही दिवसांपूर्वी ५५ हजार रुपयांची लाच घेताना रंगेहाथ पकडलं होतं.

****

भारतीय फुटबॉलपटू सुनील छेत्री यानं काल समाजमाध्यमाद्वारे निवृत्ती जाहीर केली आहे. कोलकत्यात सहा जून रोजी होणारा कुवेतविरुद्धचा शेवटचा सामना तो खेळणार आहे. सुनील छेत्रीनं २००५ साली पाकिस्तानविरोधातल्या सामन्यात आंतरराष्ट्रीय फुटबॉलमध्ये पदार्पण केलं होतं. दीडशे आंतरराराष्ट्रीय सामन्यांत ९४ गोल करण्याची कामगिरी त्याच्या नावावर आहे. क्रिस्तियानो रोनाल्डो आणि

लिओनल मेस्सीनंतर जगातला सर्वाधिक गोल करणारा फूटबॉलपटू म्हणून सुनील छेत्री ओळखला जातो.

****

व्हिएतनाम इथं सुरु असलेल्या आशियाई तायक्कांदो स्पर्धेत भारताला दुसरं पदक प्राप्त झालं आहे. सीता, हर्षा सिंघा आणि उषा धामणस्कर या तिन्ही खेळाडूंनी सर्वोत्तम कामगिरी नोंदवत पुमसे खेळ प्रकारात भारतीय संघाला रौप्यपदक मिळवून दिलं.

****

महावितरणच्या 'गो-ग्रीन' योजनेअंतर्गत छत्रपती संभाजीनगर परिमंडलातल्या पर्यावरणस्नेही ग्राहकांमुळे, जवळपास २६ लाख रुपयांची वार्षिक बचत झाली आहे. 'गो-ग्रीन' योजनेनुसार, वीजग्राहकांनी छापील वीजबिलाच्या कागदाऐवजी फक्त 'ई-मेल' आणि 'एसएमएस'चा पर्याय निवडल्यास प्रतिबिलात दहा रुपये सवलत देण्यात येत आहे. त्यामुळे योजनेत सहभागी ग्राहकांची वीजबिलांमध्ये वार्षिक एकशे वीस रुपयांची बचत होत आहे.

****

नांदेड जिल्ह्यातल्या नायगाव तालुक्यात लालवंड इथं मंदिरात प्रसाद खाल्यामुळं शंभरहून अधिकजणांना विषबाधा झाली. परवा बुधवारी ही घटना घडली. स्थानिक रुग्णालयात अठरा जणांवर उपचार सुरु आहेत, तर प्रकृती गंभीर झाल्यानं काल शंभरहून अधिक जणांना नांदेड इथं उपचारासाठी हलवलं आहे. पोलिसांनी पुढील कार्यवाहीसाठी प्रसादाचा नमुना तपासणीसाठी पाठवल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठाच्या विविध अभ्यासक्रमांच्या उन्हाळी सत्र लेखी परीक्षा २४ मे ते १२ जून या कालावधीत होणार आहेत. राज्यातल्या विविध ६०१ केंद्रावर या परीक्षा होणार आहेत. परीक्षेसंबंधी सविस्तर माहिती, परिक्षेचं वेळापत्रक विद्यापीठाच्या संकेतस्थळावर उपलब्ध असून तिथूनच विद्यार्थ्यांना हॉलतिकीट डाऊनलोड घेता येणार आहेत.

****

लातूर इथल्या शब्दपंढरी प्रतिष्ठानच्या वतीनं एकदिवसीय मराठी कविसंमेलन काल पार पडलं. या कविसंमेलनात लातूर शहर तसंच जिल्ह्यातल्या अनेक कवींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. ज्येष्ठ गझलकार जोश लातूरी ऊर्फ जहिरोद्दीन सय्यद हे संमेलनाच्या अध्यक्षस्थानी होते.

****

छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात पाणी पुरवठ्यासाठी जून महिनाअखेर पर्यंत नियोजन करावं, असे निर्देश जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी सर्व उपविभागीय आणि तालुकास्तरीय अधिकाऱ्यांना दिले आहेत. जिल्ह्यातल्या टंचाई निवारण उपाययोजनांच्या आढावा बैठकीत ते काल बोलत होते. छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यात सध्या ४१२ गावं अणि ६१ वाड्यांमध्ये टँकरने पाणी पुरवठा होत आहे. याशिवाय २८५ गावांमधल्या ३४६ विहिरींचे अधिग्रहण करण्यात आलं आहे.

****

आगामी दिवसांत नागरिकांनी उष्माघात प्रतिबंधात्मक उपायांवर भर द्यावा, असं आवाहन, बीड जिल्हा प्रशासनानं केलं आहे. उष्माघातावरील उपचारासाठी शासकीय रूग्णालयांत सज्जता ठेवण्याच्या सूचनाही जिल्हा रुग्णालय प्रशासनाला देण्यात आल्या आहेत.

दरम्यान, मान्सून पूर्व तयारीसाठी आवश्यक कार्यप्रणालीस यंत्रणेनं सज्ज राहावं, असे निर्देश बीडचे अपर जिल्हाधिकारी डॉ. त्रिगुण कुलकर्णी यांनी दिले.

****

हिंगोली इथंही जिल्हाधिकारी जितेंद्र पापळकर यांनी काल मान्सून पूर्वतयारी बैठक घेतली. जिल्ह्यातली सर्व शहरं आणि ग्रामीण भागातल्या फलकांचं सर्वेक्षण करुन अनाधिकृत, धोकादायक असलेले फलक हटवण्याचं काम तातडीनं करावं, अशी सूचना त्यांनी यावेळी केली.

****

हिंगोली जिल्ह्यात गेल्या काही दिवसापासून तापमानात लक्षणीय वाढ झाली असून, जलस्त्रोतातील पाणी पातळी मोठ्या प्रमाणावर घट होताना दिसून येत आहे. जिल्ह्यात धरण साठ्यातील पाणी कमी झालं असून, १५ लघु प्रकल्प जोत्याखाली आले आहेत.

****

लातूर जिल्ह्यात शिरूर अनंतपाळ तालुक्यातल्या घरणी मध्यम प्रकल्प आणि उमरगा लघु पाटबंधारे तलावात गाळमुक्त धरण, गाळयुक्त शिवार अभियान अंतर्गत गाळ उपसा करण्यात येत आहे. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांनी काल या प्रकल्पांना भेट देऊन कामाची पाहणी केली. यामुळे प्रकल्पाच्या साठवण क्षमतेत अंदाजे सहा कोटी लिटरनं वाढ होणार आहे.

****

दौंड - निझामाबाद एक्सप्रेस आज मुदखेड ते निझामाबाद दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली आहे. तर निझामाबाद - पंढरपूर एक्सप्रेस उद्या १८ तारखेला निजामाबाद-मुदखेड दरम्यान अंशतः रद्द करण्यात आली असल्याचं, दक्षिण मध्य रेल्वेच्या नांदेड विभागीय कार्यालयानं कळवलं आहे.

****

लातूर शहर आणि परिसरात काल दुपारी पुन्हा एकदा वादळी वाऱ्यासह अवकाळी पाऊस झाला. हवामान विभागानं लातूर जिल्ह्यासाठी येत्या दोन दिवसांसाठी 'यलो अलर्ट' जारी केला आहे. त्या पार्श्वभूमीवर नागरिकांनी सतर्क राहावं, असं आवाहन जिल्हा प्रशासनानं केलं आहे.

****

बीड शहरात काल रात्री जोरदार पाऊस झाला. जिल्ह्यात गेल्या आठवड्यातही झालेल्या अवकाळी पावसामुळे शेती पिकांचं नुकसानही झालं असून, पंचनामे करण्याचे निर्देश पालकमंत्री धनंजय मुंडे यांनी दिले आहेत.

****

दरम्यान, येत्या दोन दिवसांत मराठवाड्यासह कोकण, मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाची शक्यता आहे. छत्रपती संभाजीनगर, बीड, धाराशिव, जालना, लातूर, पुणे, धुळे, आणि जळगावसह पश्चिम महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह ताशी ४० ते ५० किलोमीटर वेगानं वादळी वारे वाहण्याची शक्यताही हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

****